आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना क्रीडा विभागाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचा दर्जा देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण १७१४/प्रक्र.३२५/क्रीयुसे २**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख : २२ एप्रिल, २०१५

वाचा :

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २, दिनांक ३० एप्रिल, २००५.**

प्रस्तावना :

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्यावतीने भारतीय शालेय खेळ महासंघाच्या नियमानुसार तालुका ते राष्ट्रीय स्तरापर्यत विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांचे आयोजन १४, १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली या तीन वयोगटामध्ये केले जाते. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाप्रमाणेच आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रकल्पस्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर विविध क्रीडाप्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांमध्ये आदिवासी आश्रम शाळांमधील १५, १७ व १९ वयोगटातील विद्यार्थी सहभागी होतात. मात्र आदिवासी विभागाने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धांना संचालनालयाची मान्यता नसल्यामुळे या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या व विजयी होणाऱ्या खेळाडूंना २५ वाढीव क्रीडा गुण व खेळाडूंना शासन सेवेत नोकरीसाठी ठेवलेल्या ५% आरक्षणाच्या सवलतीचा फायदा मिळत नाही. अशाप्रकारे आदिवासी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा कौशल्य असूनही त्यांना अन्य विद्यार्थ्यांप्रमाणे सवलती मिळू शकत नाहीत. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, एक विशेष बाब म्हणून, आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेला क्रीडा विभागाच्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेप्रमाणे दर्जा देऊन अनुषंगिक लाभास पात्र ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

आदिवासी आश्रम शाळेतील खेळाडू विद्यार्थ्यांना अन्य खेळाडू विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलतींचा लाभ व्हावा या दृष्टीने आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेला क्रीडा विभागाच्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेप्रमाणे दर्जा देऊन अनुषंगिक लाभ देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय

क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणारे खेळाडू २५ वाढीव क्रीडा गुण सवलतीसाठी तसेच सदर स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणारे खेळाडू शासन सेवेत खेळाडूंना नोकरीसाठी ठेवलेल्या ५% आरक्षणाच्या सवलतीसाठी पात्र ठरतील.

आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेला क्रीडा विभागाच्या स्पर्धेप्रमाणे दर्जा मिळण्याच्या दृष्टीने आदिवासी विभागाच्या राज्यस्तरापर्यंतच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाचे स्वरुप व नियम सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे असणे आवश्यक राहील.

हा शासन निर्णय सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून लागू होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०४२२१११११३२७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Shantaram Parab

Digitally signed by Kiran Shantaram Parab
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4c2548f01685133f2101688957e7a232976f42dda4d4c294df0a59a75f205ac1, cn=Kiran Shantaram Parab
Date: 2015.04.22 11:23:07 +05'30'

( कि.शां.परब )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव.
२. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.
३. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे स्वीय सहाय्यक.
४. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
७. सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत).
८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत).
९. अवर सचिव, क्रीयुसे १/क्रीयुसे-३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
१०.निवडनस्ती, क्रीयुसे २

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः संकीर्ण १७१४/प्रक्र.३२५/क्रीयुसे २,**

**दिनांक २२ एप्रिल, २०१५ सोबतचे**

**परिशिष्ट - अ**

**आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेला क्रीडा विभागाच्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेप्रमाणे दर्जा मिळण्याच्या दृष्टीने आदिवासी विभागाव्दारे आयोजित होणाऱ्या राज्यस्तरापर्यंतच्या क्रीडा स्पर्धांचे स्वरुप व नियम.**

**अ) स्पर्धा आयोजन पध्दती :-**

१. आदिवासी विभागाच्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे क्रीडा व युवक सेवा संचालनालयाव्दारे निर्गमीत केलेल्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबतच्या नियमानुसार राहील.

२. आदिवासी विभागाव्दारे आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन राज्य, विभाग व प्रकल्प/जिल्हास्तर असे राहील.

३. आदिवासी विभागाव्दारे आयोजित होणाऱ्या राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेचे प्रकार व त्यामधील समाविष्ट खेळ हे शालेय खेळ महासंघाने मान्य केलेल्या स्पर्धेचे प्रकार व खेळानुसार असावेत तसेच स्पर्धेचे प्रकार व खेळ बाबी निवड करताना आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांची मान्यता घेण्यात येईल.

४. आदिवासी क्रीडा स्पर्धांचे राज्यस्तरापर्यतचे आयोजन हे आदिवासी विभागाव्दारे करण्यात येईल.

५. आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांपर्यतच्या स्पर्धांच्या आयोजनासाठी होणारा खर्च आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येईल.

६. आदिवासी विभागाव्दारा आयोजित होणाऱ्या प्रकल्प/जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संबंधीत विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा अथवा जिल्हा क्रीडा अधिकारी यांची तांत्रिक मदत/मार्गदर्शन घेण्यात येईल.

७. आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन हे राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा कार्यक्रमापूर्वी किमान ८ दिवस अगोदर करण्यात येईल.

**ब) शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शाळांची आवश्यक प्रवेश पात्रता:-**

१. राज्यशासन व आदिवासी विभागामार्फत मान्यता असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालये शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्र असतील.

**क) खेळाडू वयोगट मर्यादा व पात्रता :-**

१. शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत त्या त्या शैक्षणिक वर्षामध्ये ३१ डिसेंबर रोजी १४/१७/१९ वर्षाखालील गटासाठी असलेल्या वयोमर्यादेबरोबरच इयत्तेची अट पूर्ण करणारे विद्यार्थी-विद्यार्थीनी स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

२. १४ वर्षाखालील गट म्हणजेच ८ वी पर्यत अधिकृत प्राथमिक अथवा माध्यमिक शाळेत शिकत असलेला विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचा गट.

३. १७ वर्षाखालील गट म्हणजेच १० वी पर्यत अधिकृत प्राथमिक शाळेत शिकत असलेला विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचा गट.

४. १९ वर्षाखालील गट म्हणजेच १२ वी पर्यत अधिकृत माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असलेला विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचा गट.

---xxx---